अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ॥

# चित्तपावन मित्र




वर्ष ४८ वे

अंक २ रा

१० फेब्रुवारी २०२६

किंमत १ रुपया


१५ फेब्रुवारी



## महाशिवरात्री

निमित्त हार्दिक शुभेच्छा..!



१९ फेब्रुवारी

हिंदवी
स्वराज्य संस्थापक
छत्रपती
## शिवाजी
महाराज
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे









## धुंधुर्मास स्नेहभोजन आस्वाद घेताना सभासद





## स्नेहबंध - हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात







## वार्षिक सर्वसाधारण सभेत नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार



मा.ॲड.अजिंक्य साने

नाशिक महानगरपालिका



मा.सौ.वेदिका समीर पाटणकर

त्र्यंबकेश्वर नगरपालिका



विंग कमांडर आनंद आगाशे

यांचा सत्कार

# वार्षिक सर्वसाधारण सभा आणि धुंधुर्मास भोजन अपूर्व उत्साहात संपन्न

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या आपल्या संस्थेची ९२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता डॉ. बापये सभागृह, श्री परशुराम भवन, सी. बी. एस. येथे आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या अध्यक्षतेखाली कार्यवाह श्री. नितीन सहस्रबुद्धे यांनी सभेचे कामकाज चालविले. या वेळी विश्वस्त श्री. विवेक गोगटे, सनदी लेखापाल श्री. भालचंद्र कर्वे, कार्यकारी मंडळ आणि सुमारे १२० सभासद उपस्थित होते.

सभेत खालील विषयांना मान्यता देण्यात आली : २६ जानेवारी २०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, आर्थिक वर्ष २०२४–२५ चा अहवाल, आर्थिक वर्ष २०२४–२५ ची लेखा परीक्षित आर्थिक पत्रके, आढावा पत्रके, लेखा परीक्षण अहवाल, आर्थिक वर्ष २०२६–२७ चे अंदाज पत्रक, तसेच आर्थिक वर्ष २०२६–२७ वर्षासाठी लेखापाल म्हणून सनदी लेखापाल श्री. भालचंद्र कर्वे यांची नियुक्ती करण्यात आली.

यानंतर कार्यकारिणी सदस्य श्री. चंद्रशेखर रानडे यांनी संस्थेच्या अंजनेरी जमीन खरेदी व्यवहारात निर्माण झालेल्या कायदेशीर समस्येबाबत उपस्थितांना विस्तृत माहिती देताना या व्यवहारात संस्थेच्या भक्कम कायदेशीर परिस्थितीची आणि जागेवर दाखल केलेल्या बेकायदेशीर दाव्याची यथासांग मांडणी करून सदर विषय उपस्थित सभासदांना अवगत करून दिला. अध्यक्ष श्री. विजय साने यांनी संस्थेने याबाबत त्वरित हालचाली करून कायदेशीर प्रक्रिया सुरू केल्याचे सांगून लवकरात लवकर हे प्रकरण संस्थेच्या बाजूने निकाली निघेल असा विश्वास व्यक्त केला. विश्वस्त श्री. विवेक गोगटे यांनी चित्तपावन उद्योजक मंच पुन्हा नव्या जोमाने कार्यरत झाला असून जास्तीत जास्त व्यावसायिक बांधवांनी यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या सभेचे औचित्य साधून नाशिकमध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत विजयी झालेले एकमेव चित्तपावन नगरसेवक ॲड. अजिंक्य विजय साने, त्र्यंबकेश्वर नगर पालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या एकमेव चित्तपावन नगर सेविका सौ. वेदिका समीर पाटणकर व १५ ऑगस्ट २०२४ रोजी भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वायू सेना पदक (शौर्य) प्राप्त तसेच २६ जानेवारी २०२६ रोजी ''महाराष्ट्र गौरव'' पुरस्कार प्रदान करण्यात आलेले नाशिकचे सुपुत्र विंग कमांडर आनंद विनायक आगाशे यांचा सत्कार विश्वस्त श्री. विवेक गोगटे व अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ सभासद श्री. रमेश (विष्णू) पटवर्धन यांनी प्रत्येक सभासदाने त्याच्या वाढदिवसाला संस्थेस यथाशक्ती देणगी देण्याचा संकल्प करावा, ज्याद्वारे संस्थेच्या गंगाजळीत वाढ होईल असे आवाहन उपस्थितांना केले. यानंतर सभेपुढे अन्य कोणतेही विषय नसल्याने अध्यक्ष श्री. विजय साने यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**धुंधुर्मास सहभोजन :** गेल्या अनेक वर्षांमध्ये संस्थेच्या स्वतःच्या वास्तूत धुंधुर्मास सहभोजनाचा कार्यक्रम झाला नव्हता. तो योग या वर्षी आला आणि सभासदांनी देखील त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. जवळ जवळ ४०० सभासद या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सहभागी सभासद संख्या बघता श्री परशुराम भवन मधील कै. विजय अनंत मोडक सभागृहात पारंपरिक पंगत, टेरेसवर बुफेची व्यवस्था करण्यात आली होती. इतके सभासद या कार्यक्रमात सहभागी होण्याचा हा गेल्या काही वर्षातील उच्चांकच आहे. अतिशय उत्साही वातावरणात सभासद कुटुंबियांनी सहभोजनाचा आस्वाद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यास केटरर श्री. निलेश गोखले व त्यांचे सहकारी, तसेच संस्थेचे कर्मचारी श्री. अभिजित वैद्य आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**धुंधुर्मास सहभोजनाचा आस्वाद घेताना सभासद**



# पाटोदा येथील दिंडीचे स्वागत



संस्थेतर्फे प्रतिवर्षीप्रमाणे संत श्री निवृत्तीनाथ यात्रा, त्र्यंबकेश्वर येथे दर्शनास जाणाऱ्या वारकरी दिंडीचे स्वागत आणि एका रात्रीची निवास-भोजन व्यवस्था रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी पंचवटीमधील शुक्ल यजुर्वेदी याज्ञवल्क्य कार्यालयात करण्यात आली होती. पाटोदा येथील दिंडीचे सायंकाळी ६ वा. आगमन झाल्यावर हरिपाठ प्रवचन, सत्कार व भोजन असा कार्यक्रम करून दुसऱ्या दिवशी सकाळी दिंडी त्र्यंबकेश्वर येथे मार्गस्थ झाली.

दिंडीच्या प्रवचनकारांचा सन्मान कार्यकारिणी सदस्य श्री. अभय खरे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी कार्यवाह नितीन सहस्रबुद्धे, कोषाध्यक्ष हेरंब घारपुरे, सदस्य चंद्रशेखर रानडे, मंगला जोगळेकर व व्यवस्थापक अभिजीत वैद्य उपस्थित होते. हा उपक्रम कै. काकासाहेब गद्रे यांच्या इच्छेनुसार गेल्या सुमारे पन्नासपेक्षा जास्त वर्षांपासून आपण करीत आहोत.



*** सामुहिक व्रतबंधन ***

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे व्रतबंधन सोहळा कार्यक्रम दि.०३/०५/२०२६ रोजी संस्थेच्या, श्री परशुराम भवन येथे आयोजित करण्यात येत आहे.**
**अधिक माहितीसाठी संस्था कार्यालय किंवा दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा.**

**८३२९८९९६७८ / ०२५३-२५७६२४१ / ९८६०५१२२६७**






**पराग वैशंपायन**
फोटोग्राफर

**क्षणांचे सौंदर्य कॅमेऱ्यातून टिपतो..**
**आनंदी क्षणांच्या आठवणी आपुलकीने जपतो..**

- साखरपुडा फोटोग्राफी/व्हिडिओ
- प्रिवेडिंग फोटोशूट/व्हिडिओ
- ट्रेडिशनल वेडिंग फोटोग्राफी
- वेडिंग कँडिड फोटोग्राफी
- वेडिंग ट्रेडिशनल व्हिडिओ
- सिनेमॅटिक वेडिंग व्हिडिओ
- बेबीशॉवर शूट

*आधुनिक उपकरणांसह तरबेज टीम*

**ऑफीस : प्रभूशिल्प अपार्टमेंट, तपोवन रोड, नाशिक**
**9225762400 / 9405360834**

## विंग कमांडर आनंद आगाशे यांचा महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान



ऑगस्ट २०२३ मध्ये नाशिकचे सुपुत्र विंग कमांडर आनंद विनायक आगाशे यांनी एका अत्यंत महत्वपूर्ण मानवीय सहाय्य व आपत्ती निवारण (HADR) मोहिमेचे यशस्वी नेतृत्व केले. ज्यामध्ये १,००० पेक्षा अधिक नागरिकांचे प्राण वाचवण्यात आले. त्यांच्या असामान्य शौर्य, प्रभावी नेतृत्वगुण आणि उत्कृष्ट उड्डाण कौशल्याच्या गौरवार्थ, त्यांना दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी भारताच्या माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते वायू सेना पदक (शौर्य) प्रदान करण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वतीने यंदाच्या प्रजासत्ताक दिनी, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी नाशिक पोलिस परेड ग्राउंड येथे मा. पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे जलसंपदा व आपत्ती निवारण मंत्री श्री. गिरीश महाजन यांच्या शुभ हस्ते त्यांना 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संस्थेतर्फे विंग कमांडर आगाशे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

## 'स्नेहबंध मैत्रिणींचा' - मकर संक्रांत हळदी कुंकू



'तिळगूळ घ्या गोड बोला' ह्या वर्षी आपले 'स्नेहबंध मैत्रिणींचा' मकर संक्रांत हळदी कुंकू शुक्रवार दिनांक २३/०१/२०२६ रोजी उत्साहाने पार पडले. ह्या वेळी दोन प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या.


१. 'सलाम- नमस्ते' हा आपले बोलणे व कृती ह्यातली सुसूत्रता पाहण्याचा हा खेळ आहे. ह्यात कल्पना आमडेकर व ऋचा साठे विजेत्या ठरल्या.

२. 'थिएटर-थिएटर' ह्यात सिनेमागृहांची नावे लिहिली होती. ज्या थिएटरचे नाव येईल तो महिला गट आऊट असा खेळ होता. त्यात अर्पिता घारपुरे व कल्पना गद्रे विजेत्या ठरल्या.

दोन्ही स्पर्धा जरी सोप्या वाटल्या तरी खेळायला अवघड वाटत होत्या. सर्व मैत्रिणींनी खूप आनंद घेतला. विजेत्यांना बर्वे काकूंच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

सगळ्या मैत्रिणींना साखरेचे वाण व तिळगूळ देऊन हळदीकुंकू साजरे झाले. एकूण ८२ महिला उपस्थित होत्या.

## स्नेहबंध मैत्रिणींचा - आगामी कार्यक्रम...
## नाशिक चा इतिहास आणि वारसा स्थळे



**स्नेहबंध मैत्रिणींचा पुढील महिन्याचा कार्यक्रम शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. नाशिकचे इतिहास अभ्यासक "मा. श्री. रमेश पडवळ यांचे नाशिकचा इतिहास आणि वारसा स्थळे या विषयी माहितीपट आणि व्याख्यान" आयोजित करण्यात आले आहे.**

**आपण राहात असलेल्या शहराबद्दल अनेक मूलभूत आणि महत्वाची माहिती आपल्याला नसते. ती जाणून घेण्याची ही एक उत्तम संधी आहे. हा कार्यक्रम सर्व सभासदांसाठी आहे. (महिला व पुरुष) तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे...**

**ठिकाण : 'परशुराम भवन', वेळ : सायंकाळी ५.३० ते ७.३० पर्यंत.**

# चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमारी यशश्री किशोर उपासनी (भाटे)** एन ९/डी ३०/१/तुळजा भवानी चौक, जुने सिडको, नाशिक. | २१/०८/१९९९ | चंद्रात्रे | ५'.३'' | बी.कॉम. | – |

## ✻ ऋण निर्देश ✻

आपल्या चित्तपावन मित्र अंकाची भाषा शुद्धी तपासण्याचे काम वर्षानुवर्षे निरपेक्ष सेवा म्हणून करणाऱ्या **श्री. वसंत चिंतामणी पटवर्धन** यांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार.

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## देणगीदार - जानेवारी २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. प्रसाद प्रभाकर शिंत्रे | ४०,०००/– |
| ०२ | सौ. अनिता अरविंद पाटणकर (कै.आर्चिस अरविंद पाटणकर यांच्या२ स्मरणार्थ) | ११,०००/– |
| ०३ | श्री. अविनाश नरसिंह जोशी | १०,०००/– |
| ०४ | श्रीमती मीरा अरविंद बर्वे | १०,०००/– |
| ०५ | श्री. अविनाश दामोदर बर्वे | ५,०००/– |
| ०६ | श्री. मधुकर विश्वास वैद्य | १,००१/– |
| ०७ | श्री. प्रभाकर विश्वनाथ काळे | ५०१/– |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

– आपल्या संस्थेचे आजीव सभासद श्री. रघुनंदन दत्तात्रय भट यांच्या पत्नी सौ. सुषमा (मेघा) रघुनंदन भट यांचे २६ जानेवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, दोन जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. सौ. सुषमा भट यांनी उद्योगिनी पतसंस्थेत मोलाचे योगदान दिले. क्रोशाच्या विणकामात त्यांचा विशेष हातखंडा होता. कर्करोगासारख्या दुर्धर आजारावर दोन वेळा यशस्वी मात करून, त्यानंतरचे आयुष्य समृद्धपणे जगण्याचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.....



– आपल्या संस्थेचे सभासद शरदचंद्र परांजपे यांच्या पत्नी उषा शरदचंद्र परांजपे यांचे पुणे येथे १७ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. कै. उषा परांजपे यांना सार्वजनिक वाचनालय नाशिक चा उत्कृष्ट वाचक पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. उषा परांजपे यांनी मरणोत्तर देहदान केले आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.....

✻✻✻



...आम्ही फक्त सोनं विकत घेतो
संपर्क: पवित्र टकले
९८२२०५७०००
तुमच्या जुन्या सोन्याला सर्वोत्तम दर
टकले
ओल्ड गोल्ड
६०१, ६वा मजला, सिद्धी पूजा
बिजीनेस स्क्वेअर, लेले हॉस्पिटल
मागे, कुलकर्णी गार्डन जवळ,
शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२

## पाटोदा येथील दिंडीचे स्वागत





विंग कमांडर आनंद आगाशे यांना मा.ना.श्री.गिरीश महाजन यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान




### ❊ संस्थेच्या कार्यालय वेळेत बदल ❊

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक या आपल्या संस्थेच्या ऑफिस ची वेळ दि. १ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी १० ते दुपारी २ व दुपारी ४ ते रात्री ८ अशी करण्यात आलेली आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति,

______________________

______________________

______________________

### संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.